MHLA170001922023

दाखल दिनांक -	२२/०२/२०२१
पुर्ननोंदणी दिनांक -	२१/०३/२०२३
निकाल दिनांक -	१८/०६/२०२६
कालावधी -	वर्षे महिने दिवस
	०५ ०३ २७

औसा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांचे न्यायालयात.

(पिठासीन अधिकारी: पी. आय. मोकाशी)

नियमित दिवाणी दावा क्रमांक ४१६/२०२३
जुना नियमित दि.दावा क्रमांक १११/२०२१
निशाणी क्रं.२२.

गुलाम महमद रावसाहेब सगर,
वय – ४५ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. लामजना, ता. औसा, जि. लातूर. ----- **वादी.**

विरुध्द

१. महाराष्ट्र शासनतर्फे
जिल्हाधिकारी, लातूर.

२. तहसीलदार,
तहसील कार्यालय, औसा.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर.

४. ग्रामविकास अधिकारी,
लामजना, ता. औसा, जि. लातूर.

५. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय,
लामजना, ता. औसा, जि. लातूर. ----- **प्रतिवादी.**

दावा : कायमचा मनाईहुकूम मिळणे बाबत.

उपस्थिती –

वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. एम. शेख.
प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे एकतर्फा.

न्या य नि र्ण य

(दिनांक १८ जुन, २०२६)

सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरूध्द आदेश ७ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे कायमचा मनाईहुकूम मिळणे करीता दाखल केलेला आहे.

२. वादी हे गरीब कुटूंबातील व्यक्ती असून प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्या जागे मध्ये खालेद सायकल मार्टचा व्यवसाय करून आपली उपजिवीका भागवतात. वादी यांना सदर व्यवसायाशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नाही. वादी हा मौजे लामजना, ता. औसा, जि. लातूर येथील ग्रामपंचायत मिळकत क्लस्टर क्र.१ चा कब्जेदार व वहिवाटदार आहे. सदर जागेचे क्षेत्र पुर्व-पश्चिम २० फुट, दक्षिण-उत्तर २० फुट आहे व त्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणे आहेत:-

पुर्वेस :- महेबुब मिर्झा यांची जागा,

पश्चिमेस :- महमद मैनु शेख यांची जागा,

दक्षिणेस :- रस्ता,

उत्तरेस :- खुली जागा.

वरिल चतु:सिमेच्या आतील जमिन यापुढे '**वादग्रस्त जागा**' अशी संबोधण्यात येते.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, वाद मिळकत क्लस्टर क्र.१ ही प्रतिवादी क्र.१, २, ४ व ५ यांच्या मालकीची गावठाण जागा आहे. भुकंपानंतर क्लस्टर क्र.१ च्या जागेवर आठवडी बाजार भरण्यासाठी प्रतिवादी क्र.१ यांनी मंजुरी दिली आहे. सदर आठवडी बाजारमध्ये अनेक व्यक्तींना भाडे तत्वावर क्लस्टरची जागा देण्यात आली आहे. वादी हे सन १९९७ पासुन आजपर्यंत विना अडथळा पत्र्याचे शेड मध्ये आपला व्यवसाय करीत आहेत. वादी यांनी वेळोवेळी प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्याकडे वादग्रस्त जागा भाडे तत्वाने मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. तसेच इतर अनेक व्यक्तींनी ही क्लस्टर भाडे तत्वाने मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे. तेंव्हा प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी मासिक सभा बोलावून त्या सभेमध्ये चर्चा करून ग्रामपंचायत सदस्य यांनी वादीला वादग्रस्त जागेमध्ये भाडे तत्वावर व्यवसाय करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी हे वादग्रस्त जागेचे सन १९९७ पासुन कब्जेदार आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी वादग्रस्त जागेचे नाहरकत

प्रमाणपत्र वादीच्या हक्कात दिलेले आहे. वादी हे वादग्रस्त जागेवर प्रत्यक्षरित्या काबीज आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी वेळोवेळी भाडे तत्वावर जागा दिलेली आहे. वादी हे त्यांचा व्यवसाय सन १९९७ पासुन करीत आलेले आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी दिलेल्या क्लस्टरमध्ये वादी खालेद सायकल मार्ट म्हणुन व्यवसाय करीत आहेत. ज्याचा ताबा प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीला दिला होता. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीला अंदाजे २० x ३० फुट मोकळा भुखंड वाटप केला होता. त्यानंतर वादीने तेथे पत्राचे शेड उभारले.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.५ यांनी वादी यांना दिनांक १०/०३/२००५ रोजी नाहरकत प्रमाणपत्र वाद मिळकतीच्या संदर्भाने दिले आहे. वादीचा वादग्रस्त जागेमधील ताबा मागील सन १९९७ पासुन आजपर्यंत अविरतपणे आहे. वादी यांनी सन १९९७ पासुन आजपर्यंत पत्र्याचे शेड बांधुन आपला व्यवसाय खालीद सायकल मार्ट असे सुरु करून आपला उदर निर्वाह करीत आहेत. वादी यांनी वादग्रस्त जागे मध्ये एम.एस.ई.डी.सी.एल विभाग किल्लारी यांच्या कडुन विज जोडणी करून घेतली आहे. तसेच वादी हे प्रतिवादी क्र.४ व ५ यांना वादग्रस्त जागेचे भाडे प्रतिमहा विनाखंड देत आलेले आहेत. वादी भविष्यातदेखील प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे सर्व आवश्कय शुल्क न चुकता भरण्यास तयार व इच्छुक आहेत.

६. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ यांनी दिनांक १५/०२/२०२१ रोजी वादीला नोटीस दिली जी वादीला दि.१६/०२/२०२१ रोजी मिळाली. सदर नोटीसीमध्ये दिनांक १८/०२/२०२१ पर्यंत पत्र्याचे शेड काढुन घेण्याचे आदेशीत केले होते. जर वादीने असे केले नाही तर कोणतीही पुर्व सुचना न देता शासकीय नियमानुसार अतिक्रमण हटवले जाईल. सन १९९७ पासून आजपर्यंत वादीचा वादग्रस्त जागेवर शांततापुर्ण ताबा असुन तो आपल्या कुटूंबाच्या उदरनिर्वाहसाठी सदरचा व्यवसाय करत आहे. परंतू, प्रतिवादी क्र. २ ने त्याच्या व्यवसायासाठी कोणतीही पर्यायी जागा दिलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र. २ ने वादीच्या उदरनिर्वाहसाठी आणि व्यवसायाच्या जागेसाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था केलेली नाही.

प्रतिवादी क्र. २ ने पत्राचे शेड हटवण्यासाठी वादीला खुप कमी वेळ दिला आहे, जे नैसर्गिक न्याय तत्वाच्या विरूध्द आहे. तसेच वादीची बाजु न ऐकता प्रतिवादी क्र. २ ने दि.१५/०२/२०२१ रोजीची वादग्रस्त नोटीस बजावली आहे, ज्यामुळे वादीवर अन्याय होत आहे. जर प्रतिवादी क्र. २ वादीने उभारलेले पत्राचे शेड हटवण्यात यशस्वी झाला तर वादीला उपासमारीला सामोरे जावे लागेल, त्याच्या कुटूंबाला मोठया अडचणीत यावे लागेल व वादीचे पैशाच्या स्वरूपात न भरून येणारे नुकसान होणार आहे.

७. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी हे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी निश्चीत केलेल्या भाडे पट्टयाच्या तत्वावर वादग्रस्त जागेचे प्रत्यक्ष ताबेदार आहेत. वादीने वसुली अधिका-यामार्फत प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना संपुर्ण आवश्यक शुल्क आणि कर भरलेले आहेत. दि.०४/०९/२०११ रोजी वादीने साप्ताहिक आणि मासिक शुल्क रक्कम रूपये २००/- भरले आहेत. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीकडून संपुर्ण कर आणि शुल्क स्विकारलेले होते.

प्रतिवादी क्र. २ ने वादीचा वादग्रस्त जागेवरील दिर्घकाळाचा ताबा आणि व्यवसाय विचारात न घेता दि.१५/०२/२०२१ रोजी वादीला बेकायदेशीर नोटीस बजावली आहे. त्यात असा आरोप केला आहे की, वादी अतिक्रमणकर्ता असुन त्याने बेकायदेशीरपणे पत्राचे शेड उभारले आहे आणि ते वादीला वादग्रस्त जागेमधुन बाहेर काढतील. वादी प्रतिवादीच्या संमतीनेच सदर वादग्रस्त जागेचे ताबेदार आहेत. तसेच वादीने आजपर्यंत प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या कार्यालयाचे संपुर्ण कर आणि शुल्क भरले आहेत. त्यामुळे कायदेशीररित्या प्रतिवादींना वादीचे पत्राचे शेड वादग्रस्त जागेतुन काढुन टाकण्याचा किंवा बेदखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. वादी हा वादग्रस्त जागेवर भाडेकरून असुन, त्याची कोणतीही चुक नाही.

८. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीने दि.१७/११/२०१२ रोजी प्रतिवादी क्र. १ कडे विनंती केली आणि दि.२३/१०/२०१७ रोजी वादी व इतर

दुकानदारांना सुनावणीचे पत्र बजावण्यात आले. दि.०१/११/२०१७ रोजी सुनावणी झाली ज्यात सुनावणीच्या दिवशी कागदपत्रे व पुरावे आणण्यास सांगण्यात आले होते. सर्कल इन्सपेक्टर आणि लामजना तलाठी यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्याचप्रमाणे तलाठी आणि सर्कल इन्स्पेक्टर यांनी दि.०२/०५/२०१९ रोजी वादीसह अर्जदारांच्या ताब्याबाबतचे वस्तुस्थिती अहवाल प्रतिवादी क्र. २ ला दिले आहेत.

९. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी हा एक गरिब माणुस आहे आणि त्याचे संपुर्ण कुटूंब खालेद सायकल मार्टच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. वादीने सर्व प्रतिवादींना असे बेकायदेशीर कृत्य करू नये, हस्तक्षेप करू नये आणि त्यांना वादग्रस्त जागेतुन बेदखल करू नये अशी विनंती केली. परंतू, सर्व प्रतिवादींनी वादीची विनंती स्पष्टपणे नाकारली आणि दि. १५/०२/२०२१ रोजी नोटीस देऊन स्वत:हुन, स्वत:च्या खर्चाने वादग्रस्त जागेवरील अतिक्रमण दि.१८/०२/२०२१ पर्यंत काढुन टाकण्याचे आदेशित केले. सदरच्या नोटीसीमुळेच वादीस सदर दावा दाखल करण्याचे कारण उद्भवले. त्यामुळे प्रतिवादींनी वादग्रस्त जागेमध्ये येऊन कायदेशिर प्रकियेशिवाय रोखठोक अडथळा करू नये असा कायमचा मनाईहुकूम वादीच्या हक्कात प्रतिवादी विरुध्द देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती वादीने केली आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्यावर समन्स व नोटीसची बजावणी होऊनही ते सदर दाव्याकामी हजर झाले नाहीत. त्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारित करून सदर दावा प्रतिवादी क्र. १ ते ५ विरूध्द एकतर्फा चालवण्यात आला आहे.

११. वादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या कथनावरुन व न्यायालयीन अभिलेखावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ घेतले असून त्याचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदविलेले आहेत.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादी हे सिध्द करतो काय की, वादग्रस्त जागेवर त्याचा ताबा आहे ?	नाही.
२.	वादी हे सिध्द करतो काय की, प्रतिवादी क्र. २ ने वादीला बजावलेली दि.१५/०२/२०२१ ची नोटीस ही कायदयानुसार विहित प्रक्रिया न पाळता पाठवलेली आहे ?	नाही.
३.	वादी हे सिध्द करतो काय की, तो प्रतिवादींविरूध्द कायमस्वरूपी मनाई आदेश मिळण्यास पात्र आहे ?	नाही.
४.	आदेश व हुकूमनामा काय ?	दावा खारिज करण्यात येतो.

कारणमिमांसा

१२. वादीने त्याच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१९ वर दाखल केले आहे. वादीतर्फे साक्षीदार सलिम जानिमियॉ मुल्ला यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र. २० वर दाखल केले आहे.

वादीने नि.क्र. ४ लगत दि.१५/०२/२०२१ रोजी तहसीलदार यांनी दिलेल्या नोटीसीची छायांकित प्रत, दि.०४/१०/२०१७ रोजी वादीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत, दि.१५/०२/२००४ रोजीचे नाहरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत, दि.१३/०९/२०१७ रोजीचे नाहरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत, दि.०२/०५/२०१८ रोजीचे मंडळ अधिकारी यांच्या अहवालाची छायांकित प्रत, वादीचे खालेद सायकल मार्ट चा परवाना असलेबाबतची छायांकित प्रत, कर भरलेल्या पावतीच्या छायांकित प्रती इ. कागदपत्रे दाखल केले आहेत. वादीने त्यांचा पुरावा संपल्याबाबतची पुरसिस नि.क्र.२१ वर दाखल केली आहे.

<u>मुद्दा क्र. १ करिता:-</u>

१३. वादीच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने दाव्याच्या शाबिती कामी त्यांचे स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१९ वर दाखल करून दाव्यातील कथनांची तंतोतंत पुनरावृत्ती केली

आहे. तसेच साक्षीदार क्र. २ सलिम जानिमियॉ मुल्ला यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र. २० वर दाखल केले आहे. त्यांनी वादीच्या कथनास दुजोरा दिलेला आहे. प्रतिवादींनी दाव्यात हजर होऊन साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे प्रतिवादींविरूध्द ''उलटतपास नाहीचा'' आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादींनी साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्यामुळे वादीचा पुरावा विना अव्हानात्मक आहे.

१४. वादीचे असे कथन आहे की, क्लस्टर क्र. १ हे त्यांना प्रतिवादींनी भाडे तत्वावर दिलेले आहे. वादी हे वादग्रस्त जागेमध्ये सन १९९७ पासून भाडे तत्वावर काबीज असताना प्रतिवादी क्र. २ यांनी बेकायदेशीर रित्या वादीस कोणतीही पुर्व सुचना न देता वादग्रस्त जागेमधुन वादीला बेदखल करण्याचा प्रयत्न करत आहेत. नि.क्र. ४ लगत अ.क्र. २ वर असलेल्या दि.०४/१०/२०१७ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले. सदर अर्जामध्ये वादीने मा. जिल्हाधिकारी साहेब, लातूर यांना अर्ज करून क्लस्टर १ व्यापारी संकुल म्हणुन असलेल्या जागेमध्ये १९९७ पासून त्यांचे पत्राचे शेडचे दुकान खालीद सायकल मार्ट असुन सदर जागा त्यांना कायम स्वरूपी शासनाच्या नियमाप्रमाणे मुल्य भरून घेऊन देण्याची मागणी केली आहे.

नि.क्र. ४ लगत असलेल्या दि.१३/०९/२०१७ रोजीच्या नाहरकत प्रमाणपत्राचे अवलोकन केले. सदर नाहरकत प्रमाणपत्र ग्रामपंचायत कार्यालय लामजना यांनी वादीला दिले आहे व त्यांची वादग्रस्त जागेवर सायकल दुकान चालवण्यासाठी कोणतीही हरकत नाही. वादीने दाखल केलेला दि.०४/१०/२०१७ रोजीचा अर्ज आणि नाहरकत प्रमाणपत्र हे छायांकित प्रती

आहेत. वादीने अभिलेखावर सदर अर्ज आणि नाहरकत प्रमाणपत्राची मुळ प्रती दाखल केलेली नाही किंवा सदर प्रती दुय्यम पुरावा म्हणुन ग्राहय धरला जावा याकरिता सुध्दा कुठलाही अर्ज अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर अर्जाची छायांकित प्रत आणि नाहरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत पुरावा म्हणुन ग्राहय धरता येणार नाही.

१५. वादीने दाव्यात कथन केले आहे की, वादग्रस्त जागा ही प्रतिवादींच्या मालकीची गावठाण जागा आहे. यावरून हे स्पष्ट होते की, वादग्रस्त जागेचे मालक हे प्रतिवादी आहेत ही बाब वादीला मान्य आहे. वादीने एम.एस.ई.डी.सी.एल विभाग किल्लारी यांच्याकडुन विदयुत जोडणी वादग्रस्त जागेमध्ये घेतली आहे असे वादीचे कथन आहे. परंतू, वादीच्या नावाने घेतलेले वादग्रस्त जागेवरील विदयुत मिटर हा दावा मिळकतीच्या मालकीचा किंवा ताब्याचा पुरावा नाही. दि.०२/०५/२०१८ रोजी मंडळ अधिकारी, लामजना यांनी तहसीलदार यांना अर्जदाराच्या ताब्यात किती जागा आहे त्या बाबतच्या वस्तुस्थितीच्या अहवालाची छायांकित प्रत दाखल केली आहे. परंतू, सदर अहवाल वादीने पुराव्याकामी सिध्द केला नसल्यामुळे तो ग्राहय धरता येणार नाही.

फॉर्म क्र. एफ व कर पावत्यांच्या छायांकित प्रती वादीने याकामी नि.क्र. ४ लगत दाखल केलेल्या आहेत. सदरचे कागदपत्रे मुळ नसल्यामुळे व वादीने ते पुराव्यामध्ये सिध्द केले नसल्यामुळे तो पुरावा म्हणुन ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे, वादीने फक्त साक्षीपुराव्यामध्ये व दाव्यामध्ये त्यांचा ताबा वादग्रस्त जागेवर आहे असे कथन केले असल्याने ते कागदोपत्री पुराव्याअभावी सिध्द होत नाही.

त्यामुळे, सदर वादग्रस्त जागेवर वादीचा ताबा आहे हे पुराव्याअभावी सिध्द होऊ शकले नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. २ करिता:–</u>

१६. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ ने वादीला बजावलेली दि.१५/०२/२०२१ ची नोटीस ही कायदयानुसार विहित प्रक्रिया न पाळता पाठवलेली आहे. परंतू, नि.क्र. ४ लगत अ.क्र. १ वर दाखल असलेल्या सदर छायांकित नोटीसीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादीने कायदयाचे पालन करून मौजे लामजना, ता. औसा येथील क्लस्टर १ मधील बाजाराचे जागेतील व लामजना उमरगा व लामजना तपसेचिंचोली रोड लगत अनाधिकृतपणे शेड मारून व्यवसाय करत असलेल्या व्यक्तीना अतिक्रमण काढणेबाबत दिलेली आहे.

सदरची नोटीस ही छायांकित प्रत असली तरी वादीने त्यांच्या दाव्यामध्ये व सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र. २ ने दि.१५/०२/२०२१ रोजी नोटीस देऊन दि.१८/०२/२०२१ पर्यंत अनाधिकृतपणे शेड मारून व्यवसाय करत असलेल्या व्यक्तीनी अतिक्रमण काढुन घ्याचे याकरिता दिल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे, सदरची नोटीस ही प्रतिवादी क्र. २ ने बेकायदेशीर, कायदयानुसार विहित प्रक्रिया न पाळता पाठवली असे सिध्द होत नाही. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र. ३ करिता:–</u>

१७. मुद्दा क्र. १ व २ च्या निष्कर्षानुसार वादीने वादग्रस्त जागेवर त्याचा ताबा सिध्द केलेला नाही व प्रतिवादी क्र. २ ने वादीस बेकायदेशीर नोटीस पाठवली

असे सिध्द केले नाही. त्यामुळे, वादी हा प्रतिवादींविरूध्द कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाही. सबब, मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

मुद्दा क्र. ४ करिता:–

१८. प्रतिवादींविरूध्द सदरचा दावा जरी एकतर्फा चालला असला तरी वादीने वादीचा वादग्रस्त जागेवर ताबा आहे हे सिध्द करण्यासाठी मुळ कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल करून सिध्द केला नसल्यामुळे वादीचा वादग्रस्त जागेवर ताबा आहे हे सिध्द झाले नाही. त्याचप्रमाणे, प्रतिवादी क्र. २ ने दिलेली नोटीस ही बेकायदेशीर आहे हे वादीने कागदोपत्री पुराव्यासह सिध्द केली नाही. त्यामुळे, सदरचा दावा खारिज होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे:–

आ दे श

१. दावा खारिज करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2026.06.18 15:17:16 +0530

दिनांक १८/०६/२०२६ (पी. आय. मोकाशी)

ठिकाणः– औसा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, औसा.